‘ScholarNova Research Journal’
(International Interdisciplinary Peer Reviewed Journal)
ISSN: Online

# आधुनिक संशोधनातील नीतीतत्वे

**श्री सुरज आत्माराम पवार**
संशोधक विद्यार्थी
अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर पुणे
Mobile number -9011656408
Mail ID- sp482646@gmail.com

**प्रास्ताविक:-**

*मनुष्य हा जिज्ञासू प्राणी आहे. त्याने अश्मयुगापासून ते आधुनिक युगापर्यंत आपली प्रगतीची घोडदौड चालू ठेवून आत्तापर्यंतचा प्रगतीचा टप्पा गाठलेला आहे.त्याने सर्वप्रथम विविध हत्यारांचा ,अग्नीचा चाकाचा शोध लावला. शेतीचा शोध हा या सर्व शोधांमध्ये क्रांतिकारक ठरला .कारण शेतीच्या शोधामुळे मानवाची भटकंती कमी होऊन मानवाला स्थिर जीवन प्राप्त झाले. या स्थिर जीवनातून विविध गरजा निर्माण झाल्या या गरजातून विविध शोधाची गरज निर्माण होऊन संशोधनाची सुरुवात झाली. साहित्य समाज संस्कृती विज्ञान या विविध घटकासाठी संशोधन हे एक वरदान ठरले. प्राचीन काळामध्ये मानवाने लावलेल्या शोधापासून ते अलीकडील आधुनिक शोधापर्यंत सर्व बाबींचा समावेश संशोधन या क्षेत्रात होतो. आधुनिक संशोधन हे विशिष्ट अशा नीती तत्वावर आधारलेले आहे. या नीतीतत्त्वाचा या संशोधन पर लेखांमध्ये आढावा घेणार आहोत.*

***संशोधनाची व्याख्या: -**

रीसर्च ही संज्ञा जुन्या फ्रेंच शब्दावरून आलेली आहे.तो शब्द cerchire (सर्चिअर)असा आहे.त्याचा अर्थ शोध घेणे (सर्च)शोधणे (सीक)असा आहे.त्याला Re हे पुनः या अर्थाचे उपपद लावून हा शब्द झाला आहे.आधुनिक संदर्भात शास्त्रीय प्रयोगशालेय क्षेत्रात विविध मार्ग व साधने,हत्यारे यांनी चाललेले शोधकार्य असा अर्थ रूढ झाला -(दु.का.संत)

**१.सामाजिक उपयुक्तता:-**

समाज उपयुक्तता हे आधुनिक संशोधनाचे एक महत्त्वाचे नीती तत्त्व आहे. सामाजिक उपयुक्ततेमुळे आधुनिक संशोधन हे समाजाभिमुख बनण्यास मदत झाली. संशोधनाचा पाया मुळातच सामाजिक विकास असल्याकारणाने ते समाजासाठी जीवन सुखकर करण्याचे व सामाजिक प्रगतीचे साधन ठरते. संशोधकांनी संशोधन करत असताना समाज हा केंद्रबिंदू मानून त्या केंद्रबिंदू भोवती आपली विचार प्रक्रिया चालवून संशोधन करावे हे तत्त्व नीतीशास्त्राला धरून आहे. समाजातील विविध क्षेत्राचा विकास हा संशोधनामुळे साधला जातो. साहित्य ,संस्कृती ,धर्म विज्ञान कला या अंगांचा विकास संशोधनामुळे घडून येऊन ते समाजहितासाठी उपकारक ठरते. या सर्व अंगांचा विकास पर्यायाने मनुष्याचा विकास होय. समाजाचा विकास साधला गेल्याने मानवी विकास होतो आणि अंतिमतः मानवी विकास हे समाज हिताच्या अनुषंगाने संशोधनाचे अंतिम ध्येय आहे.

**२. वस्तुनिष्ठता:-**

‘ScholarNova Research Journal’
(International Interdisciplinary Peer Reviewed Journal)
ISSN: Online

संशोधन हे वस्तुनिष्ठतेच्या पायावर आधारलेले सत्याचा आधार असणारे शास्त्र आहे. संशोधनामध्ये व्यक्तिनिष्ठतेला थारा नाही. संशोधनामध्ये काढले जाणारे निष्कर्ष हे व्यक्तिनिष्ठतेपेक्षा वस्तूनिष्ठतेवर आधारलेले असतात. ही वस्तुनिष्ठता साहित्य व शास्त्र यांपेक्षा विज्ञानावर अधिक प्रभाव पाडते. वस्तुनिष्ठतेमुळे संशोधनांमध्ये प्रमाणबद्धता येते. कोणत्याही गोष्टीची वस्तुनिष्ठ मांडणी केली असता त्यातून मिळणारे निष्कर्ष हे अचूक असतात आणि अचूक निष्कर्षामुळे संशोधनाची विश्वसनीयता व वास्तवता दिसून येते.

**३. विश्वसनीय माहितीचा आधार:-**

संशोधनामध्ये विश्वसनीय माहितीचा आधार असणे फार गरजेचे असते. विश्वसनीय माहितीचा आधार घेतल्यामुळे संशोधनातील नीती तत्त्वांना बळकटी मिळते आणि ती प्रमाणभूत मानली जातात. विश्वसनीय माहितीच्या आधारे संशोधनाचे आधार हे अधिक प्रबळ बनवता येतात. उदाहरणार्थ एखादा ऐतिहासिक दस्ताऐवज प्रमाणबद्ध ठरवण्यासाठी त्याची पाठचिकित्सा करणे गरजेचे असते. त्यासाठी त्या ऐतिहासिक दस्तऐवजाचा कालखंड ,भाषाशैली, त्या दस्तऐवजांमधील शब्दभेद पाठभेद यांचा अभ्यास करून त्या ऐतिहासिक दस्तऐवजाची विश्वसनीयता तपासली जाते. विविध शासकीय ग्रंथाच्या

**३. अनुभव सिद्ध मांडणी:-**

संशोधनामध्ये अनुभव ही गोष्ट महत्त्वाची आहे. संशोधकाने प्रत्यक्ष अनुभवाशिवाय कोणतीही गोष्ट सत्य मानू नये हा संशोधनातील एक महत्त्वाचा दंडक आहे. संशोधनाच्या प्रयोगसिद्धतेसाठी अनुभव महत्त्वाचा आहे. अनुभवाशिवाय नवनिर्मिती संभवत नाही. अनुभवामुळे संशोधनांमध्ये वास्तवता प्रस्थापित होते. आणि संशोधनामध्ये सत्यता दर्शनाची एक प्रवृत्ती निर्माण होण्यास मदत होते.

**४. वाङ्मय चौर्य टाळणे:-**

वाङ्मय चौर्य ही संशोधनातील एक महत्त्वाची समस्या आहे. वाङ्मय चौर्य टाळणे ही प्रत्येक संशोधकाची नैतिक जबाबदारी आहे. वाङ्मय चौर्यामुळे संशोधकाची प्रतिमा मलीन होते. संशोधन करत असताना वाङ्मय चौर्य टाळण्यासाठी विविध साधनग्रंथाचे संदर्भ देऊन संशोधन करणे अपेक्षित असते.वाङ्मय चौर्य टाळल्याने संशोधनामध्ये अस्सलता निर्माण होते. आपण स्वतः काहीतरी नवीन निर्माण करू शकतो असा नवनिर्मितीचा आनंद संशोधकाला मिळतो.

**५.संशोधनाचा विविध शास्त्राशी समन्वय**:-संशोधन हे एक नीतीशास्त्र आहे. संशोधनाचा विविध शास्त्राशी खूप मोठा संबंध आहे. समाजशास्त्र मानसशास्त्र राज्यशास्त्र इतिहास बोली भूगोल या घटकांचा संशोधन विषयाशी अतिशय निकटचा संबंध आहे. सामाजिक शास्त्रामध्ये विविध समाज घटक, त्यांचे परस्पर संबंध, त्यांचे वर्तन शास्त्र यांचा अभ्यास केला जातो. यामध्ये संशोधन व समाज या घटकांचा विचार प्रामुख्याने केला जातो.मानसशास्त्र आणि संशोधन यांचा अतिशय जवळचा संबंध आहे.मनाच्या अभ्यासाच्या गरजेतून मानसशास्त्राच्या संशोधनात्मक अभ्यासाला सुरुवात झाली.राज्यसंस्था व मानव यांच्यातील संबंधाचा अभ्यास करण्यासाठी राज्यशास्त्र या आंतरविदयाशाखीय संशोधनाचा अभ्यास सुरू झाला.विविध ऐतिहासिक घटना,त्या घटनांचे संदर्भ शोधण्यासाठी संशोधनाची मदत घेतली जाते.विविध बोलीभाषा,त्याची प्रादेशिकता या बाबींचा विचार बोलीभूगोलाच्या संशोधनामध्ये केला जातो.शास्त्रीय संशोधनामुळे संशोधनविषयाची व्याप्ती कळण्यास मदत होते.

'ScholarNova Research Journal'
(International Interdisciplinary Peer Reviewed Journal)
ISSN: Online

**६.संशोधकाची नैतिक जबाबदारी**:-संशोधकाची संशोधन यशस्वी करण्याची नैतिक जबाबदारी असते.संशोधकामध्ये संशोधनाची पूर्णता जिद्द असावी.संशोधकाने आपले पूर्वग्रह बाजूला ठेवून माहितीचे संकलन करावे. संशोधकाने समाजाहित डोळ्यासमोर ठेवून संशोधनाची आखणी करावी.

**७.विविध संशोधनास अर्थसाहाय्य पुरविणाऱ्या संस्था**:-संशोधनास विविध शासकीय संशोधन संस्था पुरवितात.यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग,महाज्योती,बार्टी,सारथी यांचा समावेश होतो.या संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेप नसावा.संशोधन करणाऱ्या संशोधकांना वेळेवर संशोधनासाठी आर्थिक मदत देण्यात यावी.त्यामुळे संशोधनाचा आणि त्यावर समाजाचा विकास होण्यासाठी मदत होईल.

**८. गोपनीयता:**-संशोधन हे गोपनीय असणे गरजेचे आहे. संशोधनाचे बौद्धिक हक्का द्वारा संरक्षण होणे गरजेचे आहे. या गोपनीयतेमुळे संशोधन हे सुरक्षित राहण्यास मदत होते. गोपनीयतेमुळे संशोधनांमध्ये प्रामाणिकपणा येऊन ते योग्य वेळी समाजासमोर आले असता संशोधकास नवनिर्मितीचा आनंद मिळतो. या गोपनीयतेमुळे संशोधनांमध्ये नैतिकता टिकवली जाते. संशोधनातील गोपनीयता नष्ट झाली असता त्याचे चौर्यकर्म घडून संशोधकाचे कष्ट व श्रम वाया जाण्याची शक्यता असते. गोपनीयतेमुळे संशोधनाचा दर्जा व गुणवत्ता राखली जाते.

**९.मानवता केंद्रित संशोधन विचाराची आवश्यकता**:-मानव हा संशोधनाचा केंद्रबिंदू आहे. मानव कल्याण हा संशोधनाचा गाभा आहे. मानवाला आपले जीवन सुखकारक रीतीने जगता यावे अथवा व्यतीत करता यावे या हेतूने संशोधनाची पायाभरणी असणे आवश्यक आहे. विज्ञान व मानवतावादी विचार या दोन बाबी ज्यावेळी हातामध्ये हात घालून एकत्र नांदताना दिसतील त्यावेळी संशोधनाची सफलता होईल असे वाटते.

**१०.निती अनितीचा विचार**:-संशोधन करत असताना नीती अनिती या दोन संकल्पनांचा विचार करणे आवश्यक आहे. संशोधन हे नीतीच्या पायावर आधारलेले असणे आवश्यक आहे. नैतिक मूल्यांच्या आधारे सामाजिक व व्यक्तिगत कल्याण साधता येऊन उदात्त जीवनशैलीचे प्रकटीकरण करता येते. स्वातंत्र्य समता न्याय बंधुता अभिव्यक्ती स्वातंत्र्य या भारतीय राज्यघटनेने दिलेल्या नैतिक मूल्यांचे संवर्धन संशोधन या घटकातून होणे गरजेचे आहे. त्यामुळे राष्ट्र विकास व विश्वबंधुत्व या दोन संकल्पनांचा विकास होऊन संशोधनाचे अंतिम ध्येय साध्य होईल.

**११. संशोधनातील नीतीतत्त्वे आचरणात आणण्याचे फायदे:-**

१. संशोधनामध्ये नितीतत्त्वे आचरणात आणल्याने प्रमाणबद्धता व वस्तुनिष्ठता येते.

२. संशोधनाची सामाजिक उपयुक्तता या नीती तत्त्वाच्या आधारे स्पष्ट करता येते.

३. संशोधकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी ही नीती तत्वे हातभार लावतात.

४. संशोधनविषयक नीति तत्वांचे पालन केल्याने संशोधनामध्ये एक प्रकारची विश्वसनीयता प्राप्त होते.

५. संशोधनामध्ये नीती तत्त्वांचे पालन केल्याने माहिती संकलन व त्या माहितीचे विश्लेषण या बाबी अधिक वस्तुनिष्ठपणे पार पाडल्या जातात.

१२. संशोधनातील नीती तत्त्वांचे पालन न करण्याचे तोटे:-

१. संशोधनाची दर्जा व पातळी घसरते.

२. सामाजिक विकास व्यवस्थितरित्या होत नाही.

३. नवनिर्मितीची क्षमता कमी होऊन बौद्धिक विकासाची प्रगती खुंटते.

४. संशोधनाची सुरक्षितता संशोधनविषयक नीतितत्त्वाचे पालन न केल्याने धोक्यात येते.

५. संशोधन साधनांची विश्वसनीयता व प्रमाणबद्धता ठरवणे कठीण काम होऊन बसते.

**निष्कर्ष:-**

१.संशोधन ही संशोधकाची नैतिक जबाबदारी आहे.

२.संशोधनाचा सत्यता दर्शन हा पाया आहे.

३.संशोधनामुळे विविध क्षेत्रांचा समतोल विकास होण्यास मदत होते.

४.विविध शासकीय वितीय सहाय्य देणाऱ्या संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते.

५.संशोधनामध्ये स्वमतप्रतिपादनास अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**समारोप:-**

संशोधनाचे क्षेत्र हे विविधांगी आहे.हे संशोधन क्षेत्र आंतरविदयाशाखीय ज्ञानशाखा नावीन्याचे पाठबळ पुरवते.विविध पुराव्यावर आधारलेली संशोधनाची इमारत सत्याच्या पायावर उभारलेली आहे.समाजहित हा संशोधनाचा आत्मा आहे.

**संदर्भ ग्रंथ:-**

१.संशोधन वाटा आणि वळणे, डॉ सुधाकर शेलार,अक्षरवाड्मय प्रकाशन पुणे,आवृत्ती २०१९